**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर पिन.४२३१०९
फोन नं. (०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०
(Website www.sai.org.in , E-mail – purchase@sai.org.in)

## जाहीर ई-निविदा

श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी सन २०२२-२३ करीता (ऑक्टोंबर २०२२ ते सप्टेंबर २०२३) खालील साहित्य खरेदीकामी पुरवठाधारक, वितरक, उत्पादक यांचेकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.नं. | तपशील | निविदा फी | निविदेसोबत भरावयाची बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ |
| १ | हरभराडाळ, कडधान्य, डाळी | २५,०००/- | २,५०,०००/- |
| २ | गहू, तांदूळ | २२,०००/- | २,२०,०००/- |
| ३ | खाद्यतेल व वनस्पती तूप | २२,०००/- | २,२०,०००/- |
| ४ | साखर व गुळ | २२,०००/- | २,२०,०००/- |
| ५ | किराणामाल व इतर वस्तु | २०,०००/- | २,००,०००/- |
| ६ | ड्रायफ्रुट् | २०,०००/- | २,००,०००/- |
| ७ | मसाले | २०,०००/- | २,००,०००/- |
| ८ | चहा पावडर व कॉफी | ४,८००/- | ४८,०००/- |
| ९ | बिस्किटे | १६,०००/- | १,६०,०००/- |
| १० | पत्रावळ | १६,०००/- | १,६०,०००/- |

१. ई-निविदा व ई-निविदेबाबतच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींग व अपलोडींगसाठी दि. २३/ ०९/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि. १४/ १०/२०२२ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

३. निविदा फी व बयाणा रक्कम शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

४. शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि.१७ /१० /२०२२ रोजी उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा अंशत:/पुर्णपणे स्वीकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी

**SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI**

At/post-Shirdi, Tal-Rahata, Dist- Ahmednagar- 423109

Phone No.(02423) 258500/771/772, Fax No.02423-258870

(Website www.sai.org.in , E-mail – purchase@sai.org.in)

---

## E-TENDER NOTICE

E-tenders are invited from Suppliers, Manufacturers, Dealers for the supply of following material for our Prasadalya, Ladu Nirmiti, Canteen & Temple Department for the year 2022-23 (October 2022 to September 2023).

| Sr.No. | Tender Description | Tender Fee | E.M.D. |
|---|---|---|---|
| 01 | Harbaradal, Cereals and Pulses | 25,000/- | 2,50,000/- |
| 02 | Wheat & Rice | 22,000/- | 2,20,000/- |
| 03 | Edible Oil & Vanaspati Tup | 22,000/- | 2,20,000/- |
| 04 | Sugar & Jiggery | 22,000/- | 2,20,000/- |
| 05 | Grocery & Other Material | 20,000/- | 2,00,000/- |
| 06 | Dry Fruits | 20,000/- | 2,00,000/- |
| 07 | Spices | 20,000/- | 2,00,000/- |
| 08 | Tea Powder & Coffee | 4,800/- | 48,000/- |
| 09 | Biscuits | 16,000/- | 1.60,000/- |
| 10 | Patrawal | 16,000/- | 1,60,000/- |

1. E-Tenders & its terms and conditions are available on www.mahatenders.gov.in.
2. The E-Tenders are available for Downloading & Uploading from Dt.23/09/2022 11.00 AM to 14 / 10/2022 up to 5 PM.
3. Tender Fee & EMD should be paid Online on the website www.mahatenders.gov.in
4. If possible Technical Bids will be opened on 17/10/2022.

Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi reserves the right to accept partly/fully any tender or reject all tenders without assigning any reason thereof.

(Bhagyashree Banayat, I.A.S.)
**Chief Executive Officer**

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

शिरडी ४२३ १०९.
तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर

दुरध्वनी क्रमांक (०-२४२३) २५८५००, खेरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,
फॅक्स क्रमांक -०२४२३-२५८८७०
Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.purchase@sai.org.in

**मुंबई कार्यालय** - साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर
मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३

## सन २०२२-२३
## (माहे ऑक्टोबर-२०२२ ते सप्टेंबर-२०२३ अखेर)
## श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी गुळ वार्षिक तसेच साखर तिमाही पध्दतीने पुरविणेबाबत ई-निविदा

साखरेचा तिमाही कालावधी

१. १ ऑक्टोबर २०२२ ते ३१ डिसेंबर २०२२
२. १ जानेवारी २०२३ ते ३१ मार्च २०२३
३. १ एप्रिल २०२३ ते ३० जून २०२३
४. १ जुलै २०२३ ते ३० सप्टेंबर २०२३

A. **निविदेचा तपशिल- श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी गुळ व साखर पुरविणेबाबत ई-निविदा**

B. **ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीचे निकष वगैरे तपशील खालीलप्रमाणे-**

१. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अदयावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ तत्सम शासकीय परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

२. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

३. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने FSSAI परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

४. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

५. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या फर्मची सन २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या ३ आर्थिक वर्षांची **किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम रू. १८,२४,००,०००/- (आठरा कोटी चोवीस लाख) असणे अनिवार्य राहील.** तसे उलाढाल नमुद असणारे व निविदेसोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे सी.ए यांचे प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

C. **अत्यंत महत्त्वाचे -**

१. **निविदाधारकाने निविदा भरतांना BOQ मध्ये नमूद केलेल्या साखर व गुळाचे दर भरणे अनिवार्य राहील. तसेच सर्व दर भरलेबाबतचे हमीपत्र आपले फर्मचे लेटरहेडवर सादर करणे बंधनकारक राहील. जर सर्व मालाचे/साहित्यांचे दर भरलेले नसतील तर त्यांची निविदा विचारात घेतली जाणार नाही.**

२. **BOQ मधील साखर व गुळाच्या होणा-या एकुण किमंतीनुसार न्युनतम रकमेच्या निविदाधारकास, पुरविणा-या साखर व गुळाच्या गुणवत्ता व दर्जानुसार सर्व साखर व गुळ पुरविणेबाबत पुरवठा आदेश देण्यात येईल, याची नोंद घेऊन साखर व गुळाचे दर व नमुने द्यावेत.**

D. **निविदाधारकाने मालाचे नमुने सादर करण्याची पध्दत-**

१. तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकानेच निविदेमध्ये भरलेल्या गुळ व साखरचे १ कि.ग्रॅ वजनाचे नमुने स्वतंत्र कापडी पिशवीमध्ये सिलबंद करून संस्थानच्या खरेदी विभागामध्ये विहित मुदतीत जमा करणे अनिवार्य राहिल. कापडी पिशवीवर मालाचे नांव/प्रकार तसेच आपले फर्मचे नांव लिहिलेले असावे. दिलेले नमुने कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाहीत अगर बदलता येणार नाहीत. तांत्रिक निविदेमध्ये पात्र निविदाधारकांना मालाचे नमुने सादर करणेबाबत दुरध्वनीद्वारे कळविण्यात येईल.

२. गुळ व साखरेचा उच्चतम दर्जाचा एकच नमुना सादर करावा. दोन किंवा अधिक नमुने सादर करू नये. तसे केल्यास एकाच नमुन्याचा विचार केला जाईल.

३. निविदाधारकाने साखेरचा नमुना देताना असा नमुना द्यावा की पुरवठा आदेश मिळालेनंतर त्याच नमुन्याच्या मालाचा संस्थानला पुरवठा होईल.

E. **पुरवठा करावयाच्या साहित्याचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम-**

१. सदर निविदा भरणेकामी गुळाचे वार्षिक दर भरावे. तसेच साखेरसाठी १ ऑक्टोंबर २०२२ ते ३१ डिसेंबर २०२२, १ जानेवारी २०२३ ते ३१ मार्च २०२३, १ एप्रिल २०२३ ते ३० जून २०२३ व १ जुलै २०२३ ते ३० सप्टेंबर २०२३ अशा प्रत्येकी ३ महिन्यांच्या कालावधीसाठी BOQ चे ४ भाग करण्यात आले आहेत. निविदाधारकास निविदा भरणेकामी वरील नमूद कालावधीप्रमाणे ४ BOQ मध्ये दर भरावे लागतील. निविदाधारकास ४ ही तिमाहीसाठीची निविदा भरणे बंधनकारक नाही. तथापि निविदेत एक/दोन/तीन/चार अशा कुठल्याही एका भागासाठी दर भरल्यास अगर ४ ही भागांसाठी दर भरल्यास निविदा फी व बयाणा रक्कम तेवढीच राहील. प्रत्येक भागामध्ये भरलेल्या दरांचा विचार करून अंतिम निर्णय घेण्यात येईल.

२. निविदा फी रक्कम रु.२२,०००/- व बयाणा रक्कम रु.२,२०,०००/- मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. **MSME अंतर्गत निविदा फी व बयाणा रक्कम न भरण्याची सवलत या निविदेला लागू नाही. सर्व निविदाधारकांनी निविदा फी व बयाणा रक्कम भरणे अनिवार्य आहे.**

## F. निविदाधारकांसाठी सुचना-

१. सदर निविदा दि.२३/ ०९/२०२२ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि. १४/ १० /२०२२ सायं. ०५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

२. ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

३. शक्य झाल्यास दि. १७/ १० /२०२२ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या निविदाधारकांच्याच कमर्शिअल निविदा उघडण्यात येतील.

४. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमधील तक्यात नमूद करावेत म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

## G. निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे-

१. निविदेमध्ये ऑनलाईन दर भरतांना GST-TDS, TDS अगर इतर कुठलाही शासकीय कर तसेच पॅकिंग व फॉरवर्डिंग खर्च, जकात, वाहतूक, वाराई वगैरे सर्व खर्चासह श्री साईबाबा संस्थानचे भांडार विभागामध्ये पोहोचचे दर या सर्व बाबींचा विचार करूनच दर भरावेत.

२. शासन नियमानुसार वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% GST-TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं.२०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची आधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## H. ऑनलाईन निविदा उघडण्याची व नमुने निवडण्याची कार्यपध्दती-

१. निविदेचा Download कालावधी संपल्यानंतर खरेदी समितीचे सभेत ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा प्रथम उघडण्यात येतील. त्यानंतर तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी सादर केलेल्या मालाचे नमुने तज्ञ समितीमार्फत निवडण्यात येतील.

२. नमुने निवडून अंतिम झालेनंतर कमर्शिअल बीड उघडण्यात येऊन नमुने निवड झालेल्या निविदाधारकांच्या त्या-त्या मालाच्या दरांचा तुलनात्मक दृष्टया विचार करण्यात येईल व यामध्ये न्युनतम दरधारकांशी चर्चा व वाटाघाटी करण्यात येतील व त्यानुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.

**I. साहित्य पुरवठा करावयाचे ठिकाण-**

१. निविदेत नमूद केलेल्या मालाचा पुरवठा शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थानचे श्री साईमंदिराचे जवळील भांडार विभागामध्ये अगर बायपास रोडवरील श्री साईबाबा संस्थानच्या गोडावूनमध्ये करावा लागेल. प्रसंगी लाडू, कॅन्टीन व प्रसादालय विभाग याठिकाणीही पुरवठा करावा लागेल.

**J. सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-**

१. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत मालाचा पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रक्कमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून ठेवावी लागेल निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर त्वरीत सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या पुरवठा केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२. निविदा मंजुर झालेनंतर ३% सुरक्षा अनामत रक्कम त्वरित भरावी लागेल. तसेच शिर्डी येथे समक्ष येऊन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी पुरवठाधारकास आदा करावी लागेल.

**K. मालाचा पुरवठा करण्याची मुदत -**

१. माल पुरवठा करण्याचा कालावधी १ ऑक्टोंबर २०२२ ते ३१ डिसेंबर २०२२, १ जानेवारी २०२३ ते ३१ मार्च २०२३, १ एप्रिल २०२३ ते ३० जून २०२३ व १ जुलै २०२३ ते ३० सप्टेंबर २०२३ असा राहिल.

२. माल पुरवठा मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर चलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसात मालाचा पुरवठा करावा लागेल. प्रसंगी दूरध्वनीवर कळविलेवरही पुरवठा करावा लागेल.

३. श्री साईबाबा संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठा कालावधीत अंगर त्यानंतरही पुढील वर्षाची खरेदी संबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आवश्यकतेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा मालाची मागणी श्री साईबाबा संस्थानकडून झाल्यास त्या मालाचा पुरवठा मान्य दरानेच करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

४. पुरवठा आदेश दिल्यानंतर पुरवठा आदेशात नमूद मालाचा पुरवठा हा एकदम करावयाचा नसून श्री साईबाबा संस्थानचे गरजेप्रमाणे दरमहा मागणी चलन पुरवठादारास पाठविण्यात येतील.त्यामुध्ये नमूद परिमाण इतकाच मालचा पुरवठा करावा लागेल. पुरवठा आदेशात नमूद केलेल्या परिमाणा (Quantity) ही अंदाजे रहाणार असून भक्तांच्या संख्येनुसार प्रत्यक्ष मागणी अवलंबून रहाणार आहे. त्यामुळे ई-निविदा किंवा पुरवठा आदेशात नमूद मालाइतके परिमाण (Quantity) खरेदी करणे श्री साईबाबा संस्थानवर बंधनकारक रहाणार नाही.

**L. मालाचा स्वीकार करण्याची पध्दत-**

१. पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणेच मालाचा/साहित्याचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच मालाचे बिल सादर करावे.

२. ज्या मालाच्या निविदा मंजुर होतील तो सर्व माल मान्य झालेल्या दर्जाचा व जातीचा पुरवावा लागेल. कमी दर्जाचा, वेगळया प्रकारचा अगर जातीचा किंवा खराब माल स्विकारला जाणार नाही. असा माल पुरवठा झाल्यास तो स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. तो न नेल्यास, त्या मालाची नासधूस झाल्यास त्यास श्री साईबाबा संस्थान जबाबदार राहणार नाही.

३. पुरवठाधारकाला पुरवठा आदेश दिलेनंतर श्री साईबाबा संस्थानचे तज्ञ समितीने निवडलेल्या नमुन्याप्रमाणेच माल पुरवणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहिल.

४. पुरवठा आदेशाप्रमाणे संस्थानकडे माल पाठविल्यानंतर श्री साईबाबा संस्थानने विहीत केलेले यंत्रणेकडून मालाची तपासणी केली जाईल. त्यांना योग्य वाटल्यास माल स्विकारण्यात येईल. पुरवठाधारकांनी दिलेल्या नमुन्याप्रमाणे माल पुरविण्याची दक्षता घ्यावी.

५. पुरवठा करीत असलेल्या मालाची Quantity जास्त असल्यामुळे श्री साईबाबा संस्थानकडून Randomly Sample घेऊन माल स्विकारला जातो. तथापी माल स्विकारलेनंतरही एखादा लॉट, गोणी अगर काही खराब माल आढळल्यास तो माल स्वखर्चाने बदलून द्यावा लागेल.

६. माल पुरवितांना FSSAI कायदयातील तरतुदीनुसार मालाच्या गोणीवर Date of Packing, Weight and Best Before Date चा स्पष्ट उल्लेख असावा.

७. साखरेचे पॅकिंग निव्वळ ५० किलो वजनाचे (बारदान व्यतिरिक्त) असावे. ग्रॅममधील वजन बिलासाठी ग्राह्य धरले जाणार नाही.

८. पुरवठा आदेशातील पुरवठा केलेल्या मालामध्ये भेसळ अथवा ते कमी प्रतीचे आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित पुरवठाधारकाची राहील.

९. मालाचे पॅकिंगसाठी वापरण्यात येणारे मटेरीअल Food grade असावे.

१०. पुरविलेला मालाचे गोणीचे वजन वगळता येणारे वजन विचारात घेतले जाईल.

## M. लॅब तपासणीची कार्यपध्दती-

१. पुरविलेल्या मालाची संस्थान प्रयोगशाळा/जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा/NABL/केंद्र शासनाच्या/राज्यशासनाच्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करणेत येईल.

२. श्री साईबाबा संस्थानने करुन घेतलेले लॅब तपासणीमध्ये पुरविलेल्या मालाचे रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास सदर माल बदलून द्यावा लागेल. त्यादरम्यान श्री साईबाबा संस्थानला बाहेरुन माल विकत घ्यावा लागल्यास जादा आलेल्या खर्चाची रक्कम अधिक पुरविलेला माल किंमतीच्या २ ते ५ टक्के दंड देय असलेल्या कुठल्याही मालाचे बील रकमेतून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

३. काही वेळेस लॅब रिपोर्ट येण्यासाठी विलंब होतो अशा वेळी जर आलेला माल वापरला गेला व नंतर लॅब रिपोर्ट FSSAI Standard प्रमाणे न आल्यास त्या लॉटमधील मालाच्या किंमतीच्या २ ते ५ टक्केपर्यंत दंड आकारला जाईल.

४. एकाच प्रकारच्या मालाचा लॅब रिपोर्ट सलग तीन वेळेस FSSAI Standards नुसार न आलेस सदर पुरवठाधारकावर संस्थान प्रशासनाकडून उचित कारवाई करणेबाबत निर्णय घेतला जाईल. याबाबत पुरवठादाराची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

५. श्री साईबाबा संस्थान लॅबचा रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास केंद्र शासनाच्या मुंबई येथील शासकीय/NABL लॅबमध्ये भांडार विभागाकडून तेच सॅम्पल तपासणी करुन त्याची पुर्न खात्री करण्यात येईल. सदर लॅबचा तपासणी अहवाल अंतिम समजन्यात येईल.

## N. बील आदा करण्याची पध्दती-

१. पुरविलेल्या मालाचे बिल मालाची तपासणी करुन, त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच आदा करणेत येईल. मालाच्या पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२. मालाची तपासणी करुन ताब्यात घेतलेल्या मालाचे बील श्री साईबाबा संस्थानकडे सादर केलेपासून ३० दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला आदा करण्याचा प्रयत्न राहिल.

३. पुरवठाधारकाने पुरविलेला माल श्री साईबाबा संस्थानने नाकारला व त्यामुळे पुढील कालावधीसाठी श्री संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून माल खरेदी करावा लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा श्री साईबाबा संस्थानकडून देय असलेल्या इतर मालाच्या बिलातुन वसुल केली जाईल.

४. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या कर कपाती बिलातून करण्यात येतील.

**O. <u>आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-</u>**

१. पुरवठा आदेशातील माल मुदतीत पुरविला नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या मालाची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या मालाची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२. माल पुरविणेचा आदेश दुरध्वनीवरुन अथवा मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर चलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसांचे आत मालाचा पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीचा नसल्यामुळे माल नाकारला गेल्यास श्री साईबाबा संस्थानची अडचण होऊ नये म्हणून श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितका किंवा दिलेल्या आदेशा इतका माल दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या मालासाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने श्री साईबाबा संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या मालाच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

३. निविदेतील मंजुर दराने व निवडलेल्या नमुन्याप्रमाणे माल पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरांमध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा माल पुरवठा न केल्यास श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन माल खरेदी करावा लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल. तसेच याबाबत संस्थान प्रशासनाने घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही.

४. निविदा पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकाच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक मालाचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने संस्थान प्रशासनाला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात भाववाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात भाववाढ झाली तरीही मंजुर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अगर संस्थान प्रशासन जो निर्णय घेईल तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत संबंधिताची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

५. निविदाधारकाने स्वत:साठी अगर निविदाधारकासाठी कुनीही कोणत्याही स्वरूपाचा, कोणत्याही कारणास्तव संस्थानचे विरोधात केलेला दावा/अर्ज कोणत्याही न्यायालयात प्रलंबीत नसावा. तसेच निविदाधारकाचे नाव संस्थानचे काळया यादीत समावेश नसावे.

...५...

**P. निविदा वैधता कालावधी-**

१. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी ऑनलाईन निविदेच्या अंतिम तारखेपासून १२० दिवसांचा राहील.

**Q. सर्व साधारण अटी शर्ती**

१. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्पयावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२. पुरवठादाराचे/ संस्थेचे आवश्यकता वाटल्यास Vendor Audit केले जाईल.

३. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

४. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकांच्या दरात माल पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या मालाच्या ५० टक्के मालाचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण मालाचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.

५. पुरवठादाराने मालाचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच श्री साईबाबा संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल. याबाबत संस्थान प्रशासन जो निर्णय घेतील तो आपणावर बंधनकारक राहील. याबाबत आपली काहीही तक्रार चालणार नाही.

६. कोणतीही निविदा अंशतः/पुर्णतः स्विकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे.

७. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

८. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

# निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ------------------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ------------------------------------------------------------

ऑफीस- ------------------------------------------------------------

दुकान- ------------------------------------------------------------

निवास- ------------------------------------------------------------

मोबाईल नंबर- ------------------------------------------------------------

फॅक्स नंबर- ------------------------------------------------------------

ई –मेल ------------------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ------------------------------------------------------------

दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- ---------------------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे १. ------------------------------------------------------------

२. ------------------------------------------------------------

६. बँक खाते नांव १.------------------------------------------------------------

शाखा २. ------------------------------------------------------------

खाते नंबर व प्रकार ३.------------------------------------------------------------

आयएफएससी कोड ४.------------------------------------------------------------

दिनांक :- / /२०२२

ठिकाण :-

निविदाधारकाची सही व शिक्का

अ) **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/ स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला
उत्पादक संस्थेचा दाखला/तत्सम परवाना
(उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका) ☐

२. GST नोंदणी दाखला/GST Online Registration Acknowledgement ☐

३. पॅन कार्ड ☐

४. २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या ३ आर्थिक वर्षाची सरासरी वार्षिक
उलाढालीबाबतचे चार्टर्ड अकाऊंटन्ट यांचे प्रमाणपत्र
(किमान वार्षिक उलाढाल रू.१८,२४,००,०००/- असणे अनिवार्य) ☐

५. अदयावत अन्न आणि औषध प्रशासन नोंदणी परवाना (FSSAI परवाना) ☐

६. निविदाधारकाने दर भरतांना BOQ मध्ये नमूद केलेल्या सर्व साहित्यांचे दर
भरलेबाबतचे हमीपत्र सादर केले आहे. ☐

**ब) मालाचे नमुने स्वतंत्र कापडी पिशवीमध्ये वरच्या बाजुस मालाचा प्रकार, फर्मचे नांव इ. तपशिलासह स्वाक्षरी करुन सिलबंद असलेले** ☐

दिनांक - / /२०२२
ठिकाण -

**निविदाधारकाची सही व शिक्का**

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय– सन २०२२-२३ करिता प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी गुळ व साखर पुरविण्याचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या मालाचा, आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, श्री साईबाबा संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. सदर मालाचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त मालाची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

ज्या मालाच्या निविदा मंजुर होतील, त्या मान्य दराने मालाचा पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर मालाच्या एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख भरणा करु. याकरीता बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच विहीत केलेल्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत नमुन्याप्रमाणे माल वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०२२
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव

सही/सहया व शिक्का

(१) ----------------------------------

(२) ----------------------------------

**सोबत-** कागदपत्रे

# वार्षिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ------------------------------------------------- यांचे निविदेसंबंधित व्यवसायाची सन २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या ३ वर्षांची आर्थिक उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | वर्ष | वार्षिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | सन २०१८-१९ | |
| २ | सन २०१९-२० | |
| ३ | सन २०२०-२१ | |
| | एकुण | |
| | ३ वर्षांची सरासरी वार्षिक उलाढाल | |

लेखापरीक्षकाची सही/चार्टर्ड अकाऊंटंट
(नाव/ सही शिक्का)
नोंदणी क्रमांक.

दिनांक :- / /२०२२
ठिकाण :-